MHRG190008992023

::<u>भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.१७/२०२१ मधील निशाणी क्र.२० वरील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी अर्जदार क्र.१ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथन की, मुळ अर्जदार क्र.१ हे दिनांक ०५.०२.२०२१ रोजी मयत झाले आहेत. मयत अर्जदार क्र.१ यांचे वारस म्हणजेच प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.१ मुलगा, अर्जदार क्र.२ व ३ मुली आणि अर्जदार क्र.४ पत्नी हे कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांशिवाय कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मुळ अर्जदार यांचे वारस दिनांक ०४.०५.२०२१ रोजीपर्यत अभिलेखावर घेणे आवश्यक होते परंतु मुळ अर्जदार अशिक्षीत व कायदयाचे कोणतेही ज्ञान नसल्याने त्यांना मुळ अर्जदार क्र.१ मयत झाल्याची माहिती वकीलांना दिली नाही. मुळ अर्जदार यांचे वकीलांनी अर्ज सुनावणीसाठी आल्याने मुळ अर्जदारास न्यायालयात हजर राहण्याविषयी सांगण्यात आले त्यावेळी मुळ अर्जदार मयत झाल्याचे समजल्याने प्रस्तुतचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.२१ अभिलेखावर दाखल केले आहे.

३. प्रस्तुत अर्जास विरोध करताना, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास सक्त हरकत नोंदविली आहे. अर्जास योग्य व संयुक्तीक

कारण दिलेले नाही तसेच मुदतीच्या कायदयाची बाधा येत असल्याने प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदारातर्फे वकील तसेच सामनेवाला क्र.१ व २ तर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री.योगेश तेंडुलकर व सामनेवाला क्र.३ तर्फे श्रीमती वर्षा पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०५. अर्जदार यांनी दिलेला अर्ज, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी दिलेले म्हणणे याचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. मुळ अर्जदार क्र.१ मयत झाल्याने वारस अभिलेखावर घेण्यासाठी २ वर्षे, ७ महिने आणि ९ दिवसांचा झालेल्या विलंबाचा निशाणी क्र.१८ वरील अर्ज मंजुर करण्यात आला आहे. प्रस्तुत मुळ अर्जाचा योग्य न्यायनिवाडा करण्यासाठी सर्व पक्षकारांना प्रकरणामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जातील दिलेले कारण संयुक्तीक असुन अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्जदार यांचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार म्हणुन सामील होऊन दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करण्यात यावी.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.18 17:43:09 +0530

महाड
दिनांक १८.०९.२०२५

(**श्रीमती एच.आर.जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, महाड